गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३५५ वा ● गुरुवार १६ मे २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 355 | Date : 16/05/2024 blow Thursday Page 4 Price 4

## बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वप्नतील मुंबई घडविण्याचा आमचा प्रयत्न..

### ‘रोड शो’नंतर पंतप्रधान मोदींची प्रतिक्रिया; मुंबईकरांचेही मानले आभार!






**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :**

महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज मुंबईत पंतप्रधान मोदी यांचा रोड शो आयोजित करण्यात आला होता. या रोडशोदरम्यान मोठ्या संख्येने महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष म्हणजे मुंबईत ज्याप्रमाणे गणेशोत्सवाला गर्दी उसळते तशीच गर्दी पंतप्रधान मोदींच्या रोड शो दरम्यान बघायला मिळाली. यावेळी महिला, वृद्ध आणि लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. दरम्यान, या रोडशोनंतर आता पंतप्रधान मोदींनी मुंबईतील जनतेचे आभार मानले आहे. तसेच दिवंगत बाळासाहेब । पान २ वर

## मान्सूनच्या आगमनाची तारीख ठरली

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :**

मान्सूनची आतुरतेने वाट पाहणाऱ्या सर्वसामान्य आणि शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. मान्सूनच्या आगमनाची तारीख समोर आली आहे. उन्हाच्या कडाक्या हैराण झालेल्यांसाठी ही दिलासादायक बातमी आहे. नैऋत्य मान्सून यंदा काही दिवस लवकर केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. यंदा मे महिन्याच्या अखेरीस नैऋत्य मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. मान्सून आगमनाच्या बातमीमुळे शेतकऱ्यांसह सर्वांनाच दिलासा मिळाला आहे. नैऋत्य मान्सून केरळात ३१ मे रोजी दाखल होण्याची शक्यता असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

मागील वर्षी ४ जून रोजी मान्सून केरळात दाखल होण्याचा अंदाज देण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात मान्सून ८ जून रोजी केरळमध्ये दाखल झाला होता. यंदा १९ मे रोजी दक्षिण अंदमानच्या समुद्रात मान्सून दाखल होण्याची शक्यता असल्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सर्वसामान्यपणे मान्सून १ जून रोजी केरळात दाखल होत असतो, मात्र, यंदा मान्सून लवकर केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

यंदा मान्सून सामान्य तसेच सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी २०२३ मध्ये कमकुवत मान्सून पाहायला मिळाला होता मात्र, यंदा मान्सून समाधानकारक आणि चांगला राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जगभरातील हवामानावर परिणाम करणारा एल निनो । पान २ वर

## ७० हजार कोटींचा उपमुख्यमंत्री, मग मुख्यमंत्री कितीचा असेल : उद्धव ठाकरे

**नाशिक/दैनिक यशसिध्दि न्यूज :**

७० हजार कोटींचा उपमुख्यमंत्री मग, मुख्यमंत्री कितीचा असेल, असा सवाल ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. चोराच्या हातात धनुष्यबाण दिलंय पण, मशाल बघा कशी पेटलेली आहे. राजकारणात भाजपला पोरंच होत नाहीत. म्हणून त्यांना नकली संतान, आपल्याकडचे गद्दार मांडीवर घ्यावे लागले आहेत, असं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी नाशिकच्या सभेत केलं आहे. नाशिकमध्ये बुधवारी राजाभाऊ वाजे



यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडीची भव्य सभा पार पडली. या सभेत उद्धव ठाकरेंनी सरकारवर निशाणा साधला आहे.हिंदुहृदयसम्राट शिवसेनेचे प्रमुख बाळासाहेब ठाकरेंनी स्वत: शिवसेनेची जबाबदारी । पान २ वर

## ‘जाती धर्मात ऐक्य निर्माण करण्याऐवजी अंतर वाढवणारी मोदींची भूमिका’; शरद पवारांची टीका

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :**

नरेंद्र मोदी हे पहिले असे पंतप्रधान आहे जे देशात विविध जाती धर्मामधील ऐक्य निर्माण करण्याऐवजी अंतर कसे वाढेल अशी भूमिका घेतात, असा घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. आज दिंडोरीतील वणी येथे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार भास्कर भगरे यांच्या प्रचारार्थ शरद पवारांची जाहीर सभा पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.



शरद पवार म्हणाले की, सर्वसामान्य लोकांमधील भगरे सर यांना लोकसभेत पाठवा. तुमच्या जिल्ह्यातील दोन जागा राजाभाऊ वाजे, आणि भास्कर भगरे यांना निवडून द्या ही विनंती करण्यासाठी आज इथे आलो आहे. १९८० साली या जिल्ह्यातील सगळ्या जागा आमच्या पक्षाच्या निवडून आल्या होत्या. ही निवडणूक अतिशय महत्वाची आहे रावसाहेब थोरात यांचे आज स्मरण होते आहे. शिक्षण क्षेत्रात अतिशय महत्वाची कामगिरी त्यांनी केली. मविप्रचे संस्थापक याच गावचे आहेत ही अंत:करणात आहे. लोकसभा निवडणुकीचा पाचवा टप्पा हा महत्वाचा आहे. आदिवासी आणि शेतकऱ्यांनी शिरूरमध्ये उत्साहाने मतदान केले. काळ्या आईशी इमान राखणारा हा जिल्हा आहे. शेतीला नवी। पान २ वर

## राजस्थानच्या कोलिहानमध्ये मोठी दुर्घटना; लिफ्टची साखळी तुटल्याने खाणीत अडकलेल्या १४ जणांना वाचवण्यात यश

**राजस्थान /दैनिक यशसिध्दि न्यूज**

राजस्थानच्या झुंझुनू येथे मंगळवारी रात्री हिंदुस्थान कॉपर लिमिटेडच्या कोलिहान खाणीमध्ये लिफ्टची साखळी तुटल्यामुळे लिफ्ट कोसळल्याची दुर्घटना घडली. यामध्ये १४ जण रात्रभर खाणीत अडकून पडले. यानंतर त्यांना बाहेर काढण्यासाठी रात्रीच बचावकार्य सुरू करण्यात आले होते. तब्बल ११ तास रेस्क्यू ऑपरेशननंतर अखेर १४ जणांना आज सकाळी सुखरुप बाहेर काढण्यात आले असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दक्षता पथक आणि हिंदुस्थान कॉपर लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी कोलिहान खाणीतून वरती येत असताना लिफ्टची साखळी तुटली. त्यामुळे १४ जण खोल खाणीत अडकले. खाणीत कोसळलेल्या लिफ्टमध्ये अडकलेल्या १४ जणांची रात्रभर केलेल्या रेस्क्यू ऑपरेशननंतर अखेर सुटका करण्यात आली. यानंतर सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, हिंदुस्थान कॉपर लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी आणि एक दक्षता पक्षक खाणीतील कामाच्या पाहणीसाठी खाणीमध्ये गेले होते. यावेळी खाणीत तपासणी केल्यानंतर पुन्हा वरती येत असताना अचानक लिफ्टची साखळी तुटली. त्यामुळे ते १८०० फूट खोल खाणीत अडकून पडले होते. मात्र, या घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून पाहणी करत तात्काळ रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले. खाणीत अडकलेल्या लोकांसाठी खाण्याचे पॅकेट, पाणी पाठवण्यात आले होते. औषधेही पाठवली होती.याबरोबरच डॉक्टरांचं पक्षकही तेथे बोलावण्यात आलं होतं. खाणीत अकलेल्या १४ जणांना वाचवण्यासाठी तब्बल ११ तास रेस्क्यू ऑपरेशन केल्यानंतर अखेर आज सकाळी आधी तीन जणांना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर एक-एक अशा १४ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात यश आले. तत्काळ वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी डॉक्टरांचे एक । पान २ वर

## हंजगीच्या बमलिंगेश्वर यात्रेस उद्यापासून प्रारंभ

**अक्कलकोट/प्रतिनिधी:** हंजगी येथील ग्रामदैवत श्री बमलिंगेश्वरांच्या यात्रेस शुक्रवार, १७ मेपासून विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाने सुरुवात होऊन १९ मे रोजी सामाजिक कन्नड नाट्य कार्यक्रमाने यात्रेची सांगता होणार आहे. हंजगी येथे सातशे वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले हेमाडपंथी श्री बमलिंगेश्वर मंदिर हे कर्नाटक व महाराष्ट्रातील भाविकांचे भक्तिस्थान म्हणून प्रसिध्द आहे. अशा प्रसिध्द देवस्थान यात्रेचे औचित्य साधून सध्या दररोज सायंकाळी ६.३० वाजता नूरंदेश्वर मठासमोर वेदमूर्ती धानय्या स्वामी यांच्या अमृतवाणीने ‘महादासोही कलबुर्गी शरणबसवेश्वर’ या विषयावर प्रवचन सुरू आहे. १७ मे रोजी पहाटे चार वाजता श्री बमलिंगेश्वर लिंगास रुद्राभिषेक आणि सायंकाळी सहा वाजता यण्णीमज्जन, महापूजा व नंदीध्वज यांचे आगमन होणार आहे. रात्री दहा वाजता पौराणिक ‘युध्दखंड’ बैलाट सादर होणार आहे. १८ मे रोजी पहाटे चार वाजता आरती, त्यानंतर भक्तांची । पान २ वर

## बारावीचा निकाल मेच्या तिसऱ्या तर दहावीचा चौथ्या आठवड्यात

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्य मंडळातर्फे इयत्ता बारावीचा निकाल मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात तर दहावीचा निकाल मे महिन्याच्या चौथ्या आठवड्यात जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे कोणीही निकालाबाबतच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. निकाल तयार करण्याचे काम सुरू आहे. काम पूर्ण झाल्यावर बोर्डातर्फे ऑनलाइन निकालाची तारीख अधिकृपणे जाहीर केली जाईल, असे राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी सांगितले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या दहावी-बारावीच्या परीक्षांचा निकाल केव्हा जाहीर होणार? याबाबत मोठी उत्सुकता आहे. गेल्या काही दिवसांपासून निकालाबाबत समाज माध्यमांवर अफवा पसरवल्या जात आहेत. मात्र, विद्यार्थ्यांनी व पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. बोर्डाकडून निकालाबाबत लवकरच अधिकृत घोषणा केली जाईल, असे गोसावी म्हणाले. विद्यार्थी व पालकांमध्ये निकालाबाबत मोठी उत्सुकता आहे. त्यामुळे समाज माध्यमावर प्रसिध्द होणाऱ्या निराधार बातम्यांवर अनेकांनी विश्वास ठेवला. काही शाळांमधील शिक्षकांना याबाबत विचारणा करण्यात आली.

## आशियाई तायक्वांदो स्पर्धेत भारताला दुहेरी यश; पुमसेमध्ये रौप्यपदक

**नवी दिल्ली /दैनिक यशसिध्दि न्यूज**

कांस्यपदक विजेत्या रुपा बायोरच्या कामगिरीला उजाळा देत सीता, हर्षा सिंघा, उषा धामणस्कर यांनी आशियाई तायक्वांदो स्पर्धेत भारतीय संघासाठी पदकांचे दुहेरी यश संपादन केले. या तीनही नैपुण्यवान खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आणि पुमसे खेळ प्रकारात भारतीय संघाला रौप्यपदकाचा बहुमान मिळवून दिला.हे भारतीय संघाचे या स्पर्धेतील ऐतिहासिक पदक ठरले. सीता, हर्षा आणि उषा यांनी या गटात ३० गुणांची कमाई करत पदकाचा पल्ला यशस्वीपणे गाठला. या पदकासह भारतीय संघाच्या नावे स्पर्धेत सलग दुसऱ्या पदकाची नोंद झाली. अरुणाचल



प्रदेशच्या रुपाने पहिल्याच दिवशी पदकाचे खाते उघडले होते. तिने मंगळवारी पुमसे गटात कांस्यपदकाची कमाई केली होती.

भारतीय तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने व्हिएतनाममधील या स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कोरोनाच्या दोन वर्षांच्या कालावधीनंतर भारतीय तायक्वांदो संघाने क्रीडा विश्वात धडाकेबाज मुसंडी मारली आहे. यामुळे संघाला पहिल्याच आशियाई स्पर्धेत पदकाचा इतिहास रचता आला. आता भारतीय संघाला या स्पर्धेत मोठे यश संपादन करण्याची संधी आहे.

भारतीय संघातील खेळाडूंनी अथक परिश्रमातून हे ऐतिहासिक पदक मिळवले आहे. गुणवंत खेळाडूंना आपला वेगळा ठसा उमवटण्याची मोठी संधी आहे. आता हे पदक सर्वांसाठी अभिमानास्पद ठरलेले आहे, यामुळे हे इतिहास रचणारे खेळाडू सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहेत. यासाठी खेळाडूंनी कसून तयारी केली होती. भविष्यातही ते अशीच उंच झेप घेतील अशा शब्दात अध्यक्ष नामदेव शिरगावकर यांनी । पान २ वर

दैनिक
# यश सिद्धि न्यूज




## संपादकीय

### धास्ती वाटत असावी...

इंडिया आघाडीच्या लढाईत आता आरक्षणाचा नवा मुद्दा तापला आहे. राष्ट्रीय जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांनी मुस्लिमांना आरक्षण द्यायला हवे, असा आग्रह धरला आहे. पण धर्माच्या आधारावर लालू आरक्षण देत आहेत, हे पाहून काँग्रेसप्रणीत 'इंडिया' आघाडीचे नेतेच धास्तावल्याचे दिसत आहे. लालूप्रसाद यांच्या वक्तव्यावर भाजप आणि मित्र पक्षांच्या नेत्यांनी प्रतिक्रिया देत, त्यांचा बेगडीपणा उघड करण्याचा प्रयत्न केला आहे. पण इंडिया आघाडीतले नेतेही घाबरून, लालूप्रसादांचे समर्थन करायला पुढे आले नाहीत, हे विशेष. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर ओबीसींचे आरक्षण काढून, ते मुसलमानांना देण्याचा घाट घातल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे विरोधक बॅकफूटवर गेल्याचे दिसून येत आहे. ऐन निवडणुकीच्या प्रचारात मुस्लिमांना आरक्षण मिळालेच पाहिजे, अशी जोरदार मागणी लालूप्रसाद यांनी लावून धरली आहे. इंडिया आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यास, मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याची एकतर्फी घोषणा लालू यांनी करून टाकली. धर्माच्या आधारावर कोणतेही आरक्षण देता येणार नाही, अशी राज्यघटनेत स्पष्ट तरतूद असताना लालूप्रसाद यांनी मुस्लीम आरक्षणाचे समर्थन केल्याने 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांना यावर काय बोलावे, हे समजत नाही. त्यांना उघडपणे लालूप्रसादांचे समर्थन करणे अवघड झाले आहे. कर्नाटकात ज्याप्रमाणे एक फतवा काढून, ओबीसी आरक्षणातला टक्का मुसलमानांना परस्पर दिला, तशा प्रकारे इतरत्र आरक्षण मोहीम राबवायचा काँग्रेसचा इरादा होता. लालूप्रसादांच्या मुस्लीम आरक्षणाच्या जाहीर वक्तव्याने त्याला खोडा बसला. मोदी यांनी लालूप्रसाद यांच्या वक्तव्यावर ीव्र प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, लालूजींनी क्षुल्लक मतपेढीचे राजकारण करून एससी, एसटी आणि ओबीसी समाजाचे आरक्षण हिसकावून घेण्याचे धक्कादायक विधान आहे. आम्ही हे कधीही होऊ देणार नाही. मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखालील जनता दल (युनायटेड) ने देखील मुस्लीम आरक्षणाच्या टिप्पणीवर लालू यादव यांची निंदा केले. त्यांची भूमिका संविधानाच्या मूलभूत आत्म्याचे तसेच मंडल आयोगाच्या अहवालाचे उल्लंघन करणारी आहे, असे नितीशकुमार म्हणाले. त्यामुळे मुस्लिमांची एकगठ्ठा मते पदरात पाडून घेण्याचा विचार करणारी काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडी मात्र लालू यांना एकाकी पाडत आहे. कारण बहुसंख्य हिंदू मतांचा फटका आपल्याला बसू शकतो, याची इंडिया आघाडीला धास्ती वाटत असावी.

## स्त्रीवादी सामाजिक जाणीवांची मूल्य जोपासणारी कविता...! मुन्नाभाई नंदागवळी

आपला विदर्भ म्हणजे साहित्याची निस्सीम सेवा करणारा महत्त्वकांक्षी भाग आहे. शून्यातून विश्र्व निर्माण करणारे झीरो माईल्स, मराठी साहित्याला टक्कर देणारे विद्रोहातून सामाजिक व्यथा व वेदना मांडणी करणारे आंबेडकरवादी साहित्याला अनेक निळ्या पाखरांची माय, जगण्याची दिशा ठरवणारी ऊर्जाभूमी म्हणजेच पवित्र दीक्षाभूमी असलेल्या नागभूमी शहरातून जीवाची घालमेल करत प्रचंड आशावादी, स्त्रीवादी कवयित्री अल्काताई फुलझेले या होत.




उल्का म्हणजे अल्का या नैसर्गिक घडणाऱ्या जाणिवाप्रमाणेच एक नवी उल्का साहित्य क्षेत्रात निर्माण झाल्याचे प्रामाणिक आनंद होतो. ज्याप्रमाणे निसर्गात एक विद्रोहाने जमीन फाटून ज्वालामुखी बाहेर पडतात. तशीच भूमिका निभावताना समाजातील अमाणूष प्रकार, समाजात दररोज घडणाऱ्या घटना या नजरेसमोर होताना कवयित्री यांच्या मनात अतिशय चीड निर्माण झालेली या कवितेच्या प्रतिभेने पाहायला मिळते. कवितासंग्रहातील अनेक कविता सामाजिक भान असणाऱ्या आहेत. त्यामधून जगात होणाऱ्या अनेक बाबींना प्रश्र्न विचारणारी कविता आहे.

कवयित्री यांच्या मनात असणारी एक नव्या भविष्याची उज्ज्वल पहात होणार की नाही. हे समजत नाही. अनेक वर्षे मागासलेला समाज अन्याय, अत्याचार, सहन करत जगत होता. तीच परिस्थिती आजच्या घडीला निर्माण होण्याचे चिंतन, मनन व्यक्त करणारी ही कविता वाटते. बेरोजगारी, द्ररिद्री, अन्याय- अत्याचार, स्त्रीभृणहत्या, गुलामी, जगण्याच्या व्यथा, मनावर असणारे दुःख आदी कवितावर फुलझेले यांनी आपल्या मनातील प्रत्यय भावना मांडत सदर विषयाला हात घालत ठेचून काढले आहे. संवेदनशीलता हा कवी होणाऱ्या व्यक्तिमत्वाचा अलंकार आहे. मनात सुरू असणाऱ्या अनेक विचाराला कवी हा भावनिकरित्या एक नवा आयाम देतो. वैचारिक मंथन कवितेमध्ये असावेच लागते तर मनात घर करून राहणारी कविता तयार होते. काहीही लिहून मोकळे होणे हे माझ्या मनाला पटत नाही. कवितेचा गर्भारित अभ्यासही असावा. कविता ही खेळणी सारखी निर्जीव राहणारी कठपुतली नाही. कविता म्हणजे जीवंत, मुर्तीमंत सत्य जगाला दाखवणारी मानवाचे माणूसपण साधणारी विलक्षण अद्यावत ऊर्जा आहे. संविधानाने दिलेली, विचार सांगणारी निर्भया लेखणी आहे.

कवयित्री यांच्या काही कवितेत रममाण होतांना....

सारे काही मजकडे<br>
तरी वाटे का हुरहुर<br>
समाज व्यथा खुणावते<br>
म्हणून मनपाखरू जाई दूर दूर.

कवयित्री या माणूस आहेत. मानवाचे दु:ख रसारण्यासाठी चक्रवर्ती राजकुमार सिद्धार्थ यांनी मानवी मनाला दुःख का होतो? या शोधार्थ भ्रमण केले. आणि स्वतः ची परीक्षा पाला लावून मानवाच्या मनाचे दु:ख हे मानवाचे कर्म आहे. त्यामुळे मानवाजवळ सर्व असूनही प्रस्तुत कवितेत कवयित्री म्हणतात. सर्व जवळ असताना माझे मन मलाच प्रश्र्न करतो आहे, समाजाची कोणती व्यथा आहे जी मलाच नेहमी खुणावत असते, यामुळे मला तथागत बुद्ध यांच्या प्रमाणे त्याग करून मनाच्या वेदना शोधायला दूर दूर जावे. हे चिंतन मनाला घायाळ करणारे आहे.

आभास वाटे मना<br>
स्वर्गापरी माझे घर<br>
आस करते या धरेवर<br>
या जन्मी जोडूनीया माझे कर

महापुरुषांच्या विचारावर चालणारे कवी मन त्यांच्या घरात आनंदाने सुखावते म्हणून माझे घर स्वर्गापरी सुंदर आहे. असे कवयित्री 'आभास' या कवितेत व्यक्त होताना दिसतात. पण मला स्वर्ग हे सुंदर आहे की नरक आहे या गोंधळात मी. पण वास्तूशास्त्र करणारे मंडळी असे म्हणतात. कवीला जर या जन्मी काही आभास वाटत असेल तर ते विसरून जावे. याच जन्मात नवा जन्म सोधावा. नवे विश्र्व निर्माण करावे. ते विश्र्व म्हणजे कवयित्री यांचे घर असेल हे ठणकावून या धरतीवर आपले सर्व नातेवाईक जोडावे. असे मनोहारी परीजन आप्तस्व जोडावे असे माझ्या विचारातून कवयित्रींनी जावे. 'तरंगलहरी' या कवितेतून कवयित्री या स्वतः ची आत्मीयता मांडताना मवा वाटतात. अल्का याच तरंगलहरी आहेत. जगात याची सकारात्मक विचारसरणी अंतर्मनातील यामध्ये रुजवतात.

नवी उमेद नवी दिशा<br>
नवी पालवी नवी आशा<br>
जीवनाची असावी<br>
हीच परिभाषा......

जगण्याची परिभाषा संदर्भात कवयित्री या मोठ्या आशेने उमेदीने जीवन जगायचे आहे हे सांगतात. काळोख संपला की सूर्योदय होतो. नव चैतन्य घेऊन प्रत्येक उजाडणारा दिनकर हा मानव प्राण्यांना चला उठा जगा आणि जगवा. हे सकाळच्या प्रहाराने शिकवतो. परिवर्तन हे काळाप्रमाणे गरजेचे आहे. जग बदल घालून घाव, मज सांगून गेले भिमराव या ओळी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी जगाला सांगितले. म्हणून कवयित्री यांनाही जे नवे तेच हवे असेही वाटू लागले असावे. आपला भारत हा कसा बरे महासत्ता बनेल, देशाचे नावच लोकांना एका परंपरावादी समाज रचनेचे आवळा दाखवणारे करायचे आहे. ते म्हणजे हिंदूस्थान असे वैगेरे... पण ही जहागीरदारी आहे का कुणाची? काहीही करायला, देश आधी विकास नावाचा बनवा. गेल्या १०-१२ वर्षापासून देशाचे लचके तोडण्याचे महत्त्म कार्य सुरू आहे. कोरोनासारखी अनेक संकटे थोपावली जातात. माणसाचे जगणे मारायला. मग कुठे महासत्ता सांगणारा चौकीदार करतो भावी पिढी जगवायला देश महासत्ता. अजून भारत हाप चड्डीतून बाहेर पडलाच नाही. वैचारिक संगोपन झाले नाही. तर कुठे महासत्तेचे लोकशाही नांदणारे राज्य येईल.

लढा जीवनभर वीतभर पोटासाठी<br>
साऱ्या ब्रम्हांडाची सफर करवते<br>
आठवत गेले क्षण सुखाचे<br>
दुःखाचा मग विसर पडते.......

सत्य आणि आत्मसन्मान सांगाणारी माणसे पोटासाठी रडत नाही. पोट भरणे हे फक्त जगावे यासाठी खावे लागते. पण जीवनाचे काय? असा प्रश्र्न जेव्हा मनात येतो, तेव्हा काय करावे? हे सुचत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पोटासाठी लाचारी कधी पत्करली नाही. पोटाच चटनी खा, पण सुटाबुटात जगा. माझा समाज हा सुटाबुटात असायला हवा. ही व्यवस्था डॉ. आंबेडकरांनी निर्माण केली होती. जगण्याचे दुःख विसरा, समाज जगला तर आपण जगू ही रास्त बाजू असावी. जीवन हा तर पाण्याचा बुडबुडा आहे. पण पाणी हे जीवन आहे. मग ठरवा जगायचे कसे ? बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर या महामानवांचे विचार स्त्रियांमध्ये रुजविण्यासाठी हक्क व अधिकार संविधानात नमूद आहेत. स्त्री वादी असणे फार गरजेचे आहे. संविधानाने या पुरुषप्रधान संस्कृतीला नाकारत भेदाचा नायनाट केला. वेद नको तसा भेद नको. मानवतावाद हवा. सर्व गोष्टी पुरुषाप्रमाणे आता स्त्री सुध्दा करतात. हे दाखवून दिले आहे. जगात पुरुषासारखाच महत्त्वाचा वाटा स्त्री चा पण आहे. स्त्रीच्या वेदनेने माणसाचा जन्म होतो. हे विसरून चालणार नाही. असे ही मांडल्या जात आहे.

अंधार फार झाला<br>
येईल काय वेळ<br>
अंधार दूर सारणारी<br>
बदलेल काय व्यवस्था<br>
मन विषण्ण करणारी....

मनुस्मृती ही त्यावेळी जाळून महिलांना नवा जीवन मिळाला. सर्व हक्क प्राप्त झाले, तरी आजच्या शासनकर्ती जमात ही महिलांना योग्य तो सन्मान देत नाही. आजही महिला सुरक्षित दिसत नाही. महिलांची आजच्या या लोकशाहीच्या वातावरणात योग्य ती शिकवण दिली जात नाही. मनावरील अंधारलेला दुःख का वारंवार माथी मारला जातो हे कळत नाही. ही शासन व्यवस्था बदलावी लागेल त्यासाठी पुन्हा एकदा मनुस्मृती जाळणारा महामानव तयार व्हावे लागेल. आणि हिंदू कोडबिल वाचण करून पुन्हा नवा इतिहास घडविण्यात यावा, तरच मन अथांग करुणा वाहणारा शांत स्वभावी बोधीसत्व निर्माण होईल.

माणूस म्हणून जन्माला आलास<br>
माणुसकीचा भाव धर<br>
जाण्याआधी यमलोकी<br>
धरेवर तुझे काम कर........

या ओळी मध्ये कवयित्री म्हणतात. माणूस म्हणून जन्मलास तर अहवाल मांड, स्त्री पुरुष असा समान धागा पकड आणि उत्तम कार्य कर. जेणेकरून ही भूमाता नेहमी तुझ्या ऋणात राहील. मरणाच्या आधी मानवाला मानवाचे माणुसकी नात्याची जपणूक करावी लागेल. ज्या समाजात जन्म घेतो त्या समाजाचे आपल्याला ऋण फेडावे लागतात. तो आपला मानवधर्म आहे. जगात मानवतावादाचा धर्म पाळला पाहिजे हेच 'समाजभान' या कविमध्ये कवयित्री सांगतात. महापुरुषांनी समाजात नेहमी चांगली कामे केली आहे. अनेक वाईट परंपरांना लाथ मारुन समाजाला चांगले मार्गक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे. मार्गदर्शकांची भूमिका बजावताना मार्गदाता म्हणून अनेकदा आपला वचननाणा प्रसारित केला. समाजाचे संवेदनशील निरिक्षण करून निर्माण केलेल्या कविता वाचकांच्या आणि समीक्षकांच्या मनाला स्पर्श करणाऱ्या आहेत. कविताची वैचारिक पातळी चिंतन,मनन करायला लावतात. या कवितासंग्रहातील कविता मर्मभेदी वाचनीय असून भयानक वास्तव्य दाहकता मांडणाऱ्या आहेत. हे कवितासंग्रह वाचकांच्या मनावर राज्य करेल. हा माझा विश्र्वास आहे. व्यवस्थेला प्रश्र्न विचारणारी कविता कवयित्री अल्काताई फुलझेले यांनी अतिशय कटाक्षाने आपल्या खूमासदार शैलीने रचनाबद्ध केले. आणि ते अवांतरीत होऊन अनेकांच्या मनात आपली जागा काळजात नेहमीसाठी बिंबावणार आहेच हे नाकारता येऊ शकणार नाही. असा माझा प्राणांकीत स्नेह आहे. कवयित्री यांना मनापासून हृदयस्थ शुभेच्छा. जयभीम !

**येरंडी – बाराभाटी, जि. गोंदिया.**<br>
**मो. ९७६४६७६४९९**

पान १ वरुन

### हंजगीच्या बमलिंगेश्वर..

दिवसभर दंडवत कार्यक्रम पार पडणार आहे. रात्री ८ वाजता श्री बमलिंगेश्वर मंदिरपासून पालखी नंदीध्वजासह मिरवणूक निघणार आहे. रात्री ९.३० वाजता शोभेचे दारुकाम होणार आहे. १९ मे रोजी संपूर्ण दिवसभर डफावरील गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी पाच वाजता जंगी पैलवान कुस्त्या होणार आहेत. रात्री दहा वाजता श्री बमलिंगेश्वर नाट्य संघातर्फे कन्नड नाटक सादर होणार आहे. भाविकांनी यात्रा काळातील धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पंचकमिटीतर्फे करण्यात आले आहे.

### आशियाई तायक्वांदो स्पर्धेत.

कौतुकाचा वर्षाव केला. व्हिएतनाम येथील आशियाई स्पर्धेतील क्युरोगीच्या इव्हेंटला गुरुवारपासून सुरुवात होईल. या प्रकारातही भारतीय संघ पदकाचा प्रबळ दावेदार मानला जात आहे. भारतीय क्युरोगी संघातील प्रशांत राणा, अजय कुमार, नवीन, भुमेश कुमार मैथिल, शिवांश त्यागी, ऋषभ, सक्षम यादव, रक्षा चहर, सानिया खान, अनुशिया प्रेमराज, इतिशा दास, रुदाली बारूआ हे पदकाचे प्रबळ दावेदार आहेत.

### राजस्थानच्या कोलिहानमध्ये ..

पथक आणि काही रुग्णवाहिका देखील घटनास्थळी दाखल करण्यात आल्या होत्या. यानंतर सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाल्याची नाही.

### ७० हजार कोटींचा उपमुख्यमंत्री,

माझ्यावर सोपवली. तरीदेखील काही पावटे, आपल्या शिवसेनेला नकली शिवसेना म्हणतात. आपल्या शिवसेनेला नकली शिवसेना म्हणणारे पावटे, या पावट्यांना कुठे मोड फुटले आहेत, माहित नाही. यांची इथपर्यंत मजल गेली की, हिंदुह्रदयसम्राटांचा मी पुत्र आणि तेलंगणाच्या भाषणामध्ये ते मला नकली संतान म्हणाले. मोदीजी मी तुम्हाला माझं बर्थसर्टिफेक तुमच्याकडे मागितलं नाही, तेवढी तुमची लायकीही नाही. तुम्ही कुणी ब्रम्हदेवाचा अवतारही नाहीत, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

### बाळासाहेब ठाकरे यांच्या ..

ठाकरे यांच्या स्वप्नतील मुंबई घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही ते म्हणाले. एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.मुंबईतील भव्य अशा रोड शोमध्ये सहभागी झालेल्या आणि आम्हाला आशीर्वाद द्यायला आलेल्या प्रत्येकाचे विशेषतः महिला आणि बालकांचा मी आभारी आहे. मुंबईबरोबर आमच्या पक्षाचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. याच शहरात १९८० साली आमच्या पक्षाची स्थापना झाली होती. त्यामुळे ही बाब आमच्या बांधिलकीला अधिकच बळकट करते, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. उत्तम पायाभूत सुविधा आणि अधिक चांगल्या प्रकारचे 'सुलभ राहणीमान' या गोष्टी आमच्या दृष्टीने मुंबईच्या विकासाच्या केंद्रस्थानी आहेत. त्यामुळेच या महानगरातल्या लोकांसाठी मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू झाली आहेत, ज्यामुळे भारताच्या वृद्धीला लक्षणीय ऊर्जा मिळत आहे, असेही ते म्हणाले. या शहराला जोडणाऱ्या संपर्कव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी आणि शहरातील कोंडी कमी करण्यासाठी अलीकडेच अटल सेतूचे राष्ट्रार्पण करण्यात आले. या प्रकल्पाची अगणित लोकांनी प्रशंसा केली आहे. याशिवाय मुंबईच्या जनतेला फायदेशीर ठरणाऱ्या इतर प्रकल्पांमध्ये सांताक्रूझ चेंबूर लिंक रोड आणि कुरार भूमीगत मार्ग प्रकल्प यांचा समावेश आहे. आमचे सरकार शहरातील रस्त्यांचे एकंदर जाळे सुधारण्यासाठी सक्रियतेने काम करत आहे. या प्रकल्पांबरोबरच इतरही प्रकल्पांचा येथील लोकांना मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

मराठी अस्मितेशिवाय मुंबईचा विचारही करता येणार नाही. मराठी संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि मराठी भाषा लोकप्रिय करण्यासाठी विशेषतः युवा वर्गामध्ये तिची लोकप्रियता वाढवण्यासाठी मी व्यक्तिशः वचनबद्ध आहे. आम्ही तंत्रज्ञानाच्या सामर्थ्याचा यासाठी वापर करू आणि ही गोष्ट प्रत्यक्षात आणू, असे आश्र्वासनही त्यांनी दिले.

पुढे बोलताना त्यांनी काँग्रेसवर टीका केली. काँग्रेसने देशावर आणीबाणी लादली, सेन्सॉरशिपला प्रोत्साहन दिले आणि मजरुह सुलतानपुरी आणि किशोर कुमार यांच्यासारख्या महान व्यक्तीमत्वांचा छळ केला. अशा लोकांकडून सर्जनशीलतेचे आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व लक्षात घेण्याची अपेक्षा करता येणार नाही, असे ते म्हणाले.

मुंबईसाठी दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी जे स्वप्न पाहिले ते साकार करण्यासाठी एनडीएमधील आमच्या सहकारी पक्षांसोबत आमचा पक्ष काम करेल. मुंबईचा वापर एखाद्या एटीएमप्रमाणे करणाऱ्या नेत्यांसारखे बाळासाहेब नव्हते, त्यांना या शहराची समृद्धी आणि भरभराट पाहायची होती. अगदी हेच आम्ही घडवून आणू, असेही त्यांनी नमूद केलं.

२०१९ मध्ये महाराष्ट्रातील जनतेला एनडीए सरकार हवे होते पण आमचा जनाधार एका संधीसाधू आघाडीने चोरून नेला, ज्या आघाडीचे नेतृत्व प्रत्यक्ष कामापेक्षा स्वतःच्या वैयक्तिक वैभवाची जास्त चिंता करणारे होते. जर आमचे सरकार पूर्ण कार्यकाळासाठी सत्तेवर राहिले असते, तर प्रकल्प अधिक जास्त वेगाने पूर्ण झाले असते. मात्र, विकासाचा मार्ग २०२२ मध्ये पुन्हा रुळावर आला. आगामी काळात त्यामध्ये वाढच होत जाणार आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

### 'जाती धर्मात ऐक्य निर्माण ..

दिशा देण्याचा प्रयत्न या जिल्ह्यातील तरुण शेतकरी करत आहे. सह्याद्री संस्थेची आठवण होत आहे. या जिल्ह्याचा नावलौकिक अनेकांनी केला आहे. हा जिल्हा आदिवासींचा आहे. जल, जंगल या देशाची संपत्ती आहे. या तिन्ही संपत्तीचा मालक हा आदिवासी आहे. आज देशाचे पंतप्रधान इथे आले. नेहमीप्रमाणे भाषण केले. ते भाषण मी ऐकले. नरेंद्र मोदी हे देशातील पहिले असे पंतप्रधान आहे जे देशात विविध जाती धर्मामधील ऐक्य निर्माण करण्याऐवजी अंतर कसे वाढेल अशी भूमिका घेतात. आज नाशिकच्या सभेत त्याची पुनरावृत्ती केली, अशी टीका शरद पवार यांनी नरेंद्र मोदींवर केली आहे.

### मान्सूनच्या आगमनाची ..

कमजोर होऊ लागला आहे. ला निनोची परिस्थिती निर्माण होत असल्यामुळे यंदा चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे. जून ते ऑगस्ट या कालावधीत ला निना परिस्थिती निर्माण होईल. त्यामुळे यंदाचा मान्सून गेल्या वर्षीपेक्षा चांगला असेल, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# वाईट प्रवृत्ती रोखण्यासाठी संघटित व्हा : दिपक कांबळे

## स्वराज्य पोलिस मित्र संघटनेचा तृतिय वर्धापन दिन व राज्य स्तरीय मेळावा पुणे येथे उत्साहात संपन्न




**निफाड/प्रतिनिधी**

समाजामध्ये वाईट विचारांची राक्षसी प्रवृत्ती वाढत असून त्यामुळे अनेक गोरगरीब जनतेवर ती अन्याय होत आहे. सामाजिक शांतता भंग होत असून. अन्याय अत्याचार. भ्रष्टाचार. रोखण्यासाठी सात्विक विचारांच्या लोकांनी संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे मत स्वराज्य पोलीस मित्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिपक कांबळे यांनी पुणे येथे महात्मा फुले सभागृह . वानवडी येथे संघटनेच्या तृतियवर्धापन दिन व राज्यस्तरीय मेळाव्या प्रसंगी व्यक्त केले.

स्वराज्य पोलीस मित्र संघटनेचा तृतिय वर्धापन दिन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिपक कांबळे तसेच , राष्ट्रीय महासचिव कमलेश शेवाळे यांचे प्रमुख उपस्थितीत नुकताच साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून पोलीस मित्र बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले .याप्रसंगी समाजामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस मित्र बांधवांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला असून उत्कृष्ट सात पदाधिकारी.व उत्कृष्ट चार जिल्हे यांची निवड करून त्यांना स्वराज्य रक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी . पी आय संजय पतंगे, नगरसेवक पुणे धनराज घोगरे, भाजपा सरचिटणीस महेश पुंड, पीएसआय संतोष तानावडे, सामाजिक कार्यकर्ते इम्तियाज भाई मोमीन, लक्ष्मी घोगरे ,विशाल बोराडे, अभी जाधव, आरती ताई सपकाळ ,हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तसेच. स्वराज्य पोलीस मित्र संघटनेचे विश्र्वस्त धनश्री उत्पाद, उमेश काशीकर, योगेश पाटील, संतोष जावळे, तसेच संचालिका संगीता बोराडे, सविता तावरे, मंजुषा डोईफोडे, प्रशांत निकम व महाराष्ट्र राज्य संघटक पत्रकार राजेंद्रजी थोरात तसेच महाराष्ट्रातील स्वराज्य पोलीस मित्र संघटनेचे पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, पोलीस मित्र बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीकांत अंजुटंगी.यांनी केले तर प्रस्तावना पि.डी.सरदेसाई यांनी केले .तर कार्यक्रमाचेआयोजन संगीताताई बोराडे ,विशाल बोराडे यांनी केले होते संपूर्ण पुणे टीम यांनी उत्कृष्टपणे ही जबाबदारी पार पाडली,

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वेरी कटीबद्ध : झॅकरी मरहंका

## स्वेरीज् पॉलिटेक्निक मध्ये 'राष्ट्रीय परिषद' संपन्न



**पंढरपूर/प्रतिनिधी:**

'शिक्षण क्षेत्रात स्वेरीने आपल्या कर्तृत्वाने भक्कम स्थान निर्माण केले असून उत्तम नेतृत्व असल्यामुळे 'स्वेरी' नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अग्रेसर असते. शिक्षणासाठी लागणाऱ्या सर्व सोयी स्वेरीमध्ये उपलब्ध आहेत. याचा विद्यार्थ्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे आणि त्यातून आपला व राष्ट्राचा विकास साधला पाहिजे. एकूणच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वेरी कटीबद्ध आहे.' असे प्रतिपादन 'नेहरू पुलब्राईट यु.एस. स्टुडंट रिसर्च प्रोग्राम' च्या माध्यमातून वर्जीनिया (वॉशिंग्टन,अमेरिका) येथून संशोधनासाठी आलेल्या झॅकरी मरहंका यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलीटेक्निक) मध्ये गेल्या आठवड्यात 'रिसेंट ट्रेंडस् इन इंजिनिअरिंग अँड टेक्नोलॉजी' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. याप्रसंगी झॅकरी मरहंका हे मार्गदर्शन करत होते. दीप प्रज्वलनानंतर मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. अविनाश सपकाळ यांनी राष्ट्रीय परिषदेविषयी सविस्तर माहिती दिली.

प्रमुख अतिथी म्हणून ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी (पॉलिटेक्निक) चे प्राचार्य डॉ.श्रीकांत जोशी हे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. जोशी म्हणाले की, 'कोणत्याही यशासाठी आपल्यामध्ये उत्सुकता असायला हवी. अपयश आल्यावर निराश न होता सातत्याने प्रयत्न सुरू ठेवणे आवश्यक आहे.' असे सांगून परदेशातील व भारतीय शिक्षण पद्धती विषयी माहिती दिली. कॉलेजचे प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ यांनी संशोधनाचे महत्त्व सांगून स्वेरी कॉलेजची संशोधनामध्ये सुरू असलेली वाटचाल आणि पुढील दिशा याबद्दल माहिती दिली. यावेळी खेड (ता. उ. सोलापूर) येथील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूटचे शैक्षणिक समन्वयक प्रा.श्रीधर कुलकर्णी यांनी स्वेरीने आयोजिलेल्या 'राष्ट्रीय परिषदे' चे कौतुक केले. या राष्ट्रीय परिषदेमध्ये देशातील विविध इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या संशोधनाचे सादरीकरण केले. ही परिषद यशस्वी होण्यासाठी सर्व विभागांचे विभागप्रमुख,संशोधन विभागाचे प्रतिनिधी,प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रा.गणेश धारेकर यांनी केले तर इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा.सागर घोडके यांनी आभार मानले.

# पडघे विभागात निलेश साबरे यांच मोठ्या जल्लोषात स्वागत

**ठाणे/मिलिंद जाधव**

भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागात भिवंडी लोकसभा उमेदवार निलेश सांबरे यांच्या विजय निर्धार यात्रेला मतदारांचा उस्फूर्त प्रतीसाद मिळत असून गावोगावी मोठया उत्साहात निलेश साबरे यांच्या विजय निर्धार यात्रेचं गावोगावी भव्य स्वागत होतांना दिसत आहे. जशी निवडणुकीची तारीख जवळ येत आहे, त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात प्रचाराला गती मिळत असल्याचे दिसून येत आहे.तर पडघा विभागात जेसीबीच्या सहाय्याने निलेश सांबरे यांच्यावर फुलांची उधळण करीत फटाक्यांच्या आतिशबाजीत निलेश साबरे यांचं भव्य स्वागत करण्यात आले. ८ मे पासुन भिवंडी लोकसभा अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांनी मतदारांशी संपर्क साधण्यासाठी विजय निर्धार यात्रा सुरु केली असुन १५ मे २०२४ रोजी पडघा, डोहोळे, भोईरपाडा, चिंचवली, धामणगावं, निंबवली, भिनार, भिवंडी, शेलार, खारबाव तर आदी गावामधील नागरिकांशी संपर्क साधला. यावेळी जेसीबीच्या सहाय्याने निलेश सांबरे यांच्यावर फुलांची उधळण करीत फटाक्यांच्या आतिशबाजीत भव्य स्वागत करण्यात आले. तर विजय निर्धार यात्रा ज्या गावातुन जात होती तिथे सांबरे यांचे भव्य स्वागत करुन विजय निर्धार यात्रेला



प्रतिसाद चांगला मिळत आहे.

विजय निर्धार यात्रेच्या माध्यमातून निलेश सांबरे यांनी जिजाऊ संघटनेच्या माध्यमातून केलेले सामाजिक कामांची माहिती लोकांपर्यंत पोहचवून सांबरे यांना निवडून देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. शहरी , ग्रामीण भागातील नागरिकांना सांबरेंच्या सामाजिक कामाचे आकर्षण आहे. कोणतेही सत्तापद नसताना एवढे रचनात्मक काम उभारणे हे अनेकांना विचार करायला लावणारे आहे. भिवंडी, कल्याण, बदलापूर या शहरी पट्ट्यासह ग्रामीण भागात सांबरेंना मिळणारा नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद, भरभरून होणारे त्यांचे स्वागत, तरुण आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यातून भिवंडी लोकसभा मतदारसंघात सांबरेंच्या नावाची जास्त चर्चा आहे. निलेश सांबरे यांचा सर्वच आघाड्यांवर असलेल्या प्रचारात जी सहजता आणि उत्स्फूर्तता आहे, ती विरोधकांना आपल्या प्रचारात आणता आलेली नाही. त्यात सांबरेंनी संपूर्ण मतदारसंघात जी हवा निर्माण केली आहे, त्याचा विरोधकांनी धसका घेतल्याची पाहायला मिळत आहे. लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील महत्वाची लढत म्हणून भिवंडी लोकसभा मतदारसंघाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर यावेळी विजय निर्धार यात्रेत जिजाऊ संघटनेचे कार्यकर्ते तसेच परिसरात नागरिक मोठया संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उत्कर्ष दिव्यांग सामाजिक संस्थे कडून तसेच अखिल भारतीय माथाडी कामगार संघटनेच्या वतीने भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांना जाहीर पाठींबा देण्यात आला आहे.

# छत्रपती संभाजीराजे यांची जयंती साजरी

**कळंब/दैनिक यशसिध्दि न्यूज**

१४ मे रोजी कळंब शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व फटाक्यांची आतिशबाजी करत महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेडचे इंजि, प्रकाश धस, प्रदेशाध्यक्ष अतुल गायकवाड, जिल्हाध्यक्ष ड,तानाजी चौधरी, ड,अशोक चोंदे, तालुकाध्यक्ष दत्ता कवडे, प्रा. जगदीश गवळी, प्रा.अरविंद शिंदे, संदीप शेंडगे, युवराज नकाते, मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष प्रा, अनिल फाटक, विलास गुंटाळ, अशोक शिंदे, यश सुराणा, व ईतर मान्यवर



उपस्थित होते.

तसेच कळंब शहरातील शेरे गल्ली येथुन मोरया प्रतिष्ठानच्या वतीने मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक सावरकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, साठे चौक, जिजाऊ चौक मार्गे संभाजी चौक येथे पोहोचली. यावेळी तरुणांनी डीजेच्या तालावर नाचत जय जिजाऊ, जय शिवराय, जय शंभुराजे, अशा घोषणा देत उत्साहात जयंती पार पाडली.

# लोखंडी अजस्त्र हॉर्डिंग मृत्यूचे सापळे ठरू नयेत : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई /दैनिक यशसिध्दि न्यूज**

घाटकोपर होर्डिंग दुर्घटना अत्यंत भीषण दुर्घटना आहे. लोखंडी होर्डिंग मृत्युचे सापळे ठरू नयेत यासाठी सर्व धोकादायक होर्डिंग चे ऑडिट करावे. पुन्हा अशी दुर्घटना होऊ नये याची खबरदारी घ्यावी. या दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी असे मत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी व्यक्त केले.घाटकोपर होर्डिंग दुर्घटनास्थळी ना. रामदास आठवलेंनी भेट देऊन बचावकार्याची पाहणी करून माहिती घेतली.



दुर्घटनेतील मृतांना ना.रामदास आठवलेंनी शृद्धांजली वहिली. शासनाने दुर्घटनेतील मृतांना सांत्वनपर मदत जाहीर केळी आहे. वडाळा येथील लोखंडी शिडी कोसळून झालेली दुर्घटना चिंतनीय आहे. याप्रकरणी चौकशी करून कारवाई करावी तसेच वडाळा दुर्घटनेत बळी गेलेल्यांना शासनाने सांत्वनपर मदत करावी अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी केली आहे. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, मुंबई कार्याध्यक्ष बाळासाहेब गारुड, जिल्हा अध्यक्ष अजित रणदिवे चिंतामण गांगुर्डे राजा गांगुर्डे आदि अनेक मान्यवर उपस्थित होते.

# बार्टी संस्थेत छत्रपती संभाजी महाराज यांना विनम्र अभिवादन

**मुंबई /दैनिक यशसिध्दि न्यूज**

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक १४ मे २०२४ रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, अनिल कारंडे, शुभांगी पाटील यांनीही अभिवादन केले.

मा महासंचालक सुनिल वारे यांनी छत्रपती संभाजी राजे हे महापराक्रमी शूरवीर योद्धा होते. त्यांनी लोककल्याणकारी काम केले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची उभारणी केली तर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये योगदान दिल्याचे मत व्यक्त करुन आपण महापुरुषांच्या कार्याची प्रेरणा घेऊन काम करावे असे



आवाहन केले.

प्रकल्प व्यवस्थापक डॉ प्रेम हनवते यांनी छत्रपती संभाजी महाराज यांनी स्वराज्याचे रक्षण करून त्यांच्या कारकिर्दीमध्ये शत्रु सोबत झालेल्या सर्व लढाया त्यांनी जिंकल्या ते लढव्ये कुशल प्रशासक प्रजाहितदक्षक राजे होते असल्याचे सांगून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, विकास गायकवाड, प्रिया पवार यांनी छत्रपती संभाजी राजे यांच्या जयंतीनिमित्त मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले. आभार प्रकल्प अधिकारी सुनंदा गायकवाड यांनी मानले.

## माझी वसुंधरा अभियान ४.० शहरी भागासह ग्रामीण भागात प्रभावीपणे राबवा

सातारा : ग्रामीण भागातील गावे व शहरे स्वच्छ व सुंदर होण्यासाठी माझी वसुंधरा अभियान ४.० प्रभावीपणे राबवावे. हे अभियान राबविताना जास्तीत जास्त नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग घ्यावा, असे निर्देश पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात माझी वसुंधरा अभियान ४.० आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, उपायुक्त नगर पालिका प्रशासन पुनम मेहता, टंचाई निवारण नोडल ऑफीसर निलीमा धायगुडे, नगर प्रशासन अधिकारी पल्लवी पाटील, नगर परिषदांचे मुख्याधिकारी व गट विकास अधिकारी उपस्थित होते.माझी वसुंधरा अभियानाचा लाभ शहरी व ग्रामीण भागात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला झाला पाहिजे, असे सांगून आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, नागरिकांना स्वच्छतेच्या सवयी लावणे आपल्या हातात आहे. गावे व शहरे स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती करा. या अभियानात शहरी व ग्रामीण भागातील शाळेंच्या नोंदी कराव्यात. नोंदी झालेल्या शाळेतील विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा.ग्रामीण भागातील गायरान जागेवर ग्रामपंचायतीच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. मागील वर्षी ज्या गावांनी व शहरांनी माझी वसुंधरा अभियानात नामांकन प्राप्त केले होते त्यांनी नामांकन टिकविण्यासाठी पूर्ण वर्षभर हे अभियान राबवावे. या पुढे बैठक न घेता माझी वसुंधरा अभियानात सहभागी गावांची व शहरांची प्रत्यक्ष पहाणी करणार असल्याचेही आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले.

# वृक्ष लागवड आणि संपूर्ण स्वच्छता मोहिम युध्द पातळीवर राबवा : विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार



**सातारा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

निसर्गाची अनिश्चितता संपवायची असेल तर मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेवून ग्रीन इनपॅक्ट तयार करा. धरण क्षेत्रात आणि उजाड डोंगर, माळरान या ठिकाणी विविध शासकीय योजना, कंपन्यांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी आदी माध्यमातून वृक्ष लागवड मोहिम मोठ्या प्रमाणावार राबवा, असे सांगून प्लॅस्टिक निर्मुलन उपक्रम हाती घेवून संपूर्ण स्वच्छता मोहिमही युद्ध पातळीवर राबवा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे विभागीय आयुक्त पुणे यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई परिस्थिती आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, उपायुक्त नगरपालिका प्रशासन पुनम मेहता, टंचाई निवारण नोडल अधिकारी निलीमा धायगुडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक आणि जयंत शिंदे, उपजिल्हाधिकारी विक्रांत चव्हाण, विजया यादव, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने, यांच्यासह प्रातांधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्ह्यातील टंचाई स्थितीचा आढावा घेवून डॉ. पुलकुंडवार म्हणाले, आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर उजाड डोंगर, वैराण माळराणे दिसत आहेत. ती हिरवीगार करा. वनविभागासह सर्व यंत्रणानी पुढाकार घेूवन मोठ्या प्रमाणावर पुन्हा नवीन झाडे लावली पाहिजेत ती जगवली पाहिजेत आणि संवर्धित केली पाहिजे. याबरोबरच अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर असलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या, कचरा, घाण ही आपल्या डोळ्याला खटकली पाहिजे. आपण समाजाचा घटक आहोत. देशाचा नागरिक आहोत. आपला परिसर आपला गाव स्वच्छ ठेवणे ही आपली जबाबदारी आहे

याची जाणीव ठेवून संपूर्ण स्वच्छता मोहिम राबवा. पुढच्या पिढीसाठी प्लॅस्टिक घातक आहे याची जाणीव ठेवून कोणाचेही भय न बाळगता प्लॅस्टिकचे अनधिकृत साठे विक्री उत्पादन आदी ठिकाणी मोठया प्रमाणावर छापे टाका आणि प्लॅस्टिक निर्मुलनाची मोहिम युध्द पातळीवर राबवा.

प्लॅस्टिक माणसांच्या आणि जनावरांच्या शरीरात पोहचले आहे. पाणी अन्न प्रदुषित होत आहे. हे दुष्ट चक्र तोडण्यासाठी सर्वांनी या मोहिमेमध्ये झटून सहभागी व्हा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. सातारा जिल्ह्यामध्ये यावर्षी जलसिंचन विभागाने अनेक ठिकाणाची गळती काढण्याचे काम केले आहे. त्यामुळे पाण्याच्या दोन आवर्तनामधील कालावधी वाढून शेवटच्या घटकापर्यंत व्यवस्थितपणे पाणीपुरवठा झाला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी या बैठकीत दिली असता विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार यांनी सातारा जिल्ह्यात हे काम अत्यंत महत्त्वाचे व प्रभावी झाले असल्याचे सांगून त्यामुळे इतर कालव्यांची पाण्याची गळती काढून शेवटच्या घटकापर्यंत पाणीपुरवठा व्हावा, यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सांगितले.

चारा डेपो/ चारा छावणी मागणीचे फलटण तालुक्यातील नाईकबोमवाडी आणि सासवड या दोन ठिकाणचे प्रस्ताव शिफारशीसही शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याचेही डॉ. पुलकुंडवार यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सातारा जिल्ह्यातील टंचाई स्थितीचा आढावा सादर केला यामध्ये त्यांनी मे २०२४ मध्ये जिल्ह्यात टंचाई ग्रस्त गावे २१०, आणि वाड्या ६९४ असून ३ लाख २५ हजार १५६ बाधित लोकसंख्या आहे तर २ लाख ८ हजार ८०६ बाधित पशुधन आहे. या साऱ्यांना १९९ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून ११४ खाजगी विहीर आणि बोअर अधिग्रहीत करण्यात आल्याचे सागितले. सातारा जिल्ह्यात वाई व खंडाळा तालुक्यसाठी दुष्काळ निधी शासनाकडून प्राप्त झाला असून यामध्ये वाई तालुक्यासाठी २२ कोटी ४१ लाख तर खंडाळा तालुक्यासाठी १७ कोटी ८२ लाख इतका निधी बाधित शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान देण्यासाठी वितरीत करण्यासाठी मान्यता प्राप्त झाली आहे. सदरचा निधी हा ई पंचनामा पोर्टलवर तहसलिदारांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. जिल्ह्यात वाई व खंडाळा या तालुक्यात मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहिर करण्यात आला असून त्यामध्ये वाई तालुक्यातील ७ आणि खंडाळा तालुक्यातील ४ महसूल मंडळांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील ८९ महसूल मंडळांमध्ये दुष्काळ/ दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आली आहे. या महसूल मंडळांमध्ये शासन निर्णयानुसार सवलती लागु करण्यात आलेल्या आहेत. टंचाईग्रस्त गावांमध्ये जलजीवन मिशनची कामे पुर्ण करणे, विहीर खोलीकरण गाळ काढणे, नळपाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती, रोजगार हमीतील कामे यासारख्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत.

खरीप हंगाम २०२४ दुष्काळ परिस्थितीच्या अनुषंगाने टंचाई परिस्थितीबाबत विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामध्ये मुरघास लागवड उपक्रमास गती देण्यात येवून त्यासाठी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेतून ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. ज्या भागांमध्ये प्रकल्पांचे पाणी पोहोचले आहे तेथील शेतकऱ्यांना ज्वारी आणि मका यांचे बियाणे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील पशुधनासाठी ओला आणि सुका चाऱ्याचे जुलै २०२४ पर्यंत नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात बांबू लागवड अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत असून १० हजार हेक्टरवर बांबू लागवडीचे उद्दिष्ट हाती घेण्यात आले आहे. पावसाला सुरुवात होताच पुन्हा या मोहिमेला गती देण्यात येईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# श्री भगवंत महोत्सवाला उत्साहात प्रारंभ



**बार्शी/प्रतिनिधी:**

बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत महोत्सवाला मंगळवारपासून प्रारंभ झाला. अतिशय उत्साहात व धार्मिक वातावरणातील या महोत्सवात पहिल्या दिवशी प.पू. सदगुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या चक्रीभजनाने महोत्सवाला सुरुवात झाली. आमदार राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली भगवंत मैदानावर हा महोत्सव साजरा होत आहे. भगवंत बहुउद्देशीय संस्था व श्री भगवंत देवस्थान बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. भगवंत मंदिरातील चक्रीभजनानंतर सायंकाळी सात वाजता शंकरा ऑर्केस्ट्रा प्रस्तुत भगवंत मैदानावरील सप्तरंगी सांस्कृतिक संगीत दर्शन कार्यक्रमालाही बार्शीकरांनी दाद दिली. भगवंत महोत्सवाच्या शुभारंभप्रसंगी आमदार राऊत यांनी महोत्सवात सर्व घटकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. गेले अनेक वर्षे गाभाऱ्यात असलेला भगवंत महोत्सव आमदार राऊत यांच्या पुढाकाराने भगवंत मैदानावर आला. नगरपालिकेनेही यासाठी दहा लाख रुपयांचा निधी दिला. यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, भगवंत देवस्थान समितीचे अध्यक्ष दिलीप बुडुख, भगवंत महोत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष लोढा, माजी नगराध्यक्ष ॲड. असिफ तांबोळी, रमेश पाटील, संतोष सूर्यवंशी, माजी नगरसेवक विजय राऊत, नवनाथ चांदणे, संतोष बारंगुळे यांच्यासह व्यापारी उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी भगवंत मैदानावर बार्शीकरांची मोठी गर्दी झाली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीधर कांबळे यांनी केले .

# विठ्ठलराव शिंदे कारखान्यामार्फत ऊस तोडणी मजूरांना ३४ टक्के वाढीचा फरक एकरक्कमी अदा

## एकरक्कमी फरक देणारा राज्यातील एकमेव कारखाना : आ.बबनराव शिंदे

**माढा/प्रतिनिधी:**

साखर संघ स्तरावर झालेल्या ऊस तोडणी व बैलगाडीने वहातूकीचे सुधारीत सामंजस्य करारानुसार ऊस तोडणी मजूरांना तोडणी दरामध्ये ३४ टक्के वाढ करणेस मंजूरी दिलेनुसार विठ्ठलराव शिंदे कारखान्याने ऊस तोडणी मजूरांना ऊस गाळप हंगाम २०२३-२४ पासून तोडणी दर वाढ लागू करून फरकाची एकूण ३६ कोटी ४ लाख रक्कम बँकेत जमा करणेत आली असल्याची माहीती संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

अधिक माहीती देताना आ.शिंदे म्हणाले की, हंगाम २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन गाळप हंगामाकरीता अस्तित्वात असलेला ऊस तोडणी व वाहतूक करणा-या शेतमजूरांच्या मजूरीच्या दराकरीता असलेला करार संपल्यामुळे सन २०२३-२४ पासून शेतमजूरांच्या दरामध्ये वाढ करून नवीन करार करण्यासंबंधी ऊस तोडणी/शेत मजूरांच्या संघटनांनी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि.मुंबई यांचे स्तरावर प्रस्ताव सादर केले होते. त्यानुसार साखरसंघ स्तरावर दि.४ जानेवारी, २०२४ रोजी संघटना प्रतिनिधी व कारखाना प्रतिनिधी यांचेमध्ये बैठक होवून हंगाम २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन हंगामाकरीता डोकी सेंटर, गाडी सेंटर व टायरगाडीचे ऊस तोडणी दरामध्ये ३४ टक्के वाढ व मुकादम कमिशनमध्ये १ टक्का वाढ करून २० टक्के करणेस मंजूरी देण्यात आली आहे. हा वाढीचा करार हंगाम २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन हंगामाकरीता लागू असणार आहे. तोडणी दराचे ३४ टक्के वाढीमुळे बैलगाडी/ युवराज साठी सुधारीत दर रू.३८१.८४, डोकीसेंटर,ट्रक,ट्रॅक्टर रू.४३९.२१ व गाडी सेंटर रू.४९०.०९ असा सुधारीत दर होत आहे. या वाढीमुळे अंदाजे ३६ कोटी रूपयांचा अतिरिक्त बोजा कारखान्यावर पडला आहे.सन २०२३-२४ मध्ये युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब साठी तोड वाहतूक केलेल्या ऊस तोडणी मजूरांना ही दरवाढ



लागू करून त्यानुसार तोडणी वाहतूक बिले तयार करण्यात आली आहेत. या वाढीव दरानुसार तोडणी वाहतूक बिले तयार करून वाढीच्या फरकाची एकूण ३६ कोटी ४ लाख रक्कम बँकेत जमा करणेत आली आहे. ३४ टक्केवाढीचा फरक देणारा विठ्ठलराव शिंदे राज्यातील एकमेव कारखाना ठरला आहे. कारखान्याचा गाळप हंगाम यशस्वीरित्या पार पडणेसाठी ऊस तोडणी मजूर,मुकादम,वाहनमालक यांचा सहभाग मोठा आहे

. पुढील सन २०२४-२५ गाळप हंगामामध्ये दोन्ही युनिटकडे गाळपक्षतमेनुसार ऊस पुरवठा होणेसाठी ऊस तोडणी वाहतूकीचे करार सुरू करण्यात आले असून त्यांना कारखाना धोरणानुसार डव्हान्स वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतक-यांना दिलासा देणेच्या दृष्टीने कारखान्याने दोन्ही युनिटकडे ऊस गाळप हंगाम २०२३-२४ मध्ये कपात केलेली जळीत ऊसाची एकूण ३ कोटी ९१ लाख रक्कम संबंधित ऊस पुरवठादार शेतक-यांना परत करण्यात आली आहे. ऊस गाळप हंगाम २०२३-२४ मध्ये दोन्ही युनिट कडे गळीतास आलेल्या ऊसाची अनुदानासह संपूर्ण ऊस बिले व तोडणी वाहतूक बिले अदा करण्यात आली आहेत. पुढील सन २०२४-२५ गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडणेसाठी सभासद शेतक-यांनी जास्तीत जास्त ऊस नोंदी कारखान्याकडे द्यावेत असे आवाहन आ.शिंदे यांनी केले. सदरप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे,कार्यकारी संचालक व इतर खातेप्रमुख उपस्थित होते.

# राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून संभाजी महाराजांना अभिवादन

**सोलापूर/प्रतिनिधी:** येथील सोलापूर शहर-जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्यावतीने श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजी महाराज चौकातील संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



यावेळी बोलताना खरटमल म्हणले, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज हे एक असामान्य व्यक्तिमत्त्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असमान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी असा संभाजी महाराजांचा लौकिक आहे. तसेच समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी आपले वर्चस्व गाजवले आहे. यावेळी माजी महापौर जनार्दन कारमपुरी, प्रमोद गायकवाड, संजय जाबा, डॉ. प्रतीक्षा चव्हाण, मनीषा माने, कल्पवृक्षा गायकवाड, विजय भोईटे, बिरप्पा बंडगर, अजित पात्रे, प्रा. राहुल बोळकोटे, सूर्यकांत शेरखाने, व्ही. डी. गायकवाड, सोपान खांडेकर, प्रवीण वाडे, रामप्रसाद शगालोलू, विठ्ठल व्हनमारे, प्रमोद भवाळ, बळीराम एडके, प्रा. मोहनदास गुमते यांच्यासह शिवभक्त, कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वळसंग वाडा येथील फंटुश वॉटर पार्कचे उद्घाटन

**सोलापूर/प्रतिनिधी:**

यशस्वी उद्योजक बनण्यासाठी ध्येय, जिद्द, चिकाटी आवश्यक असून उद्योग कितीही छोटा किंवा मोठा असला तरी त्याची लाज न बाळगता पुढे जाता आले पाहिजे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे वळसंग वाडा हॉटेलचे प्रमुख सुनील बाबानगरे हे असल्याचे गौरवोद्गार अफजलपूर मठाचे श्री.ष.ब्र. विश्वाराध्य मळेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांनी काढले. अक्कलकोट ते सोलापूर रोडवरील वळसंग येथील बाबानगरे बंधू यांच्या वळसंग वाडा हॉटेल येथे लहान मोठ्यांच्या मनोरंजानांचे उत्कृष्ट माध्यम म्हणून फंटुश वॉटर पार्कची निर्मिती केली असून याचा शुभारंभ मळेंद्र शिवाचार्य यांच्या अमृत हस्ते करण्यात आला. त्यावेळी आशीर्वचन देताना ते बोलत होते.



याप्रसंगी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, युवा नेते रमेश पाटील, शॉवर अँड टॉवरचे प्रमुख संचालक विश्वराज चाकोते, युवा उद्योजक यश डोंगरे, वळसंगचे सरपंच जगदीश अंटद, माजी सरपंच श्रीशैल दुधगी, वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, आर्किटेक्चर संतोष भंडारे, मल्लिनाथ बाबानगरे, वेदमूर्ती पंडित हिरेमठ, बिराजदार आदींची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, यावेळी महास्वामीजींची पादपूजा संयोजक सुनील व अनुपमा बाबानगरे यांनी केली. उपस्थित मान्यवरांचाही स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन बाबानगरे परिवाराच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माजी गृहराज्यमंत्री म्हेत्रे यांनी सुनील बाबानगरे यांनी वळसंग वाड्याचे नाव आज देशभर पोहोचविल्याचे गौरवोद्गार काढले. यावेळी बाबानगरे परिवारास शुभेच्छा देण्यासाठी सर्व क्षेत्रातील मान्यवर व ग्राहकांनी उपस्थिती लावून शुभेच्छांचा वर्षाव केला. या सोहळ्यास वळसंग पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रेवणसिद्ध प्याटी यांनी केले तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन बमलिंग चिट्टे यांनी केले.